# दादर पश्चिमेकडील गर्दी होणार कमी

## शितलादेवी, सिद्धिविनायक मेट्रो स्थानके तयार

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

■ मेट्रो ३ भूमिगत प्रकल्प

■ उच्चाधिकाऱ्यांकडून स्थानकांची पाहणी



### ९० टक्के स्थानक उभारणी पूर्ण

मेट्रो ३च्या भूमिगत रेल्वे स्थानकांसाठी विशेष वायुविजन यंत्रणा बसवली जाणार आहे. तसेच सरकते जिने हेदेखील अत्याधुनिक पद्धतीचे असतील. यासाठी स्टेनलेस स्टील आणि काच याचा वापर करण्यात येत आहे. मेट्रो ३मधील स्थानकांची उभारणी ९० टक्के पूर्ण झाली असून या सगळ्याचा अश्विनी भिडे यांनी आढावा घेतला.

दादर पश्चिमेकडील गर्दी कमी करणारी मेट्रो ३मधील स्थानके जवळपास तयार झाली आहेत. यामध्ये शितलादेवी व सिद्धिविनायक या स्थानकांचा समावेश आहे. मेट्रो ३ला विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमएमआरसीएल) उच्चाधिकाऱ्यांनी या स्थानकांची अलीकडेच पाहणी केली.

मेट्रो ३ ही राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो रेल्वे आहे. मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर-दक्षिण जोडणारी ही सेवा आहे. या सेवेचा पहिला टप्पा सारिपूतनगर (आरे) ते बीकेसी उत्तर (प्राप्तिकर कार्यालय), असा असून तो डिसेंबर २०२३मध्ये सुरू होणार आहे. तर बीकेसी दक्षिण ते कफ परेड हा टप्पा डिसेंबर २०२४मध्ये सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे व संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता यांनी अलीकडेच मार्गिकेवरील दोन महत्त्वाच्या स्थानकांची पाहणी केली.

या मार्गिकेवरील सिद्धिविनायक व शितलादेवी, ही दोन स्थानके दादर, प्रभादेवी या परिसरातील गर्दी कमी करणारी ठरणार आहेत. ही दुसऱ्या टप्प्यातील स्थानके असून बीकेसीनंतर शितलादेवी हे दुसरे स्थानक असेल. तर त्यापुढील स्थानक हे सिद्धिविनायक असेल. या दोन्ही स्थानकांची उच्चाधिकाऱ्यांनी विस्तृत पाहणी केली. तसेच आराखड्यानुसार काम किती पूर्ण झाले आहे, अद्याप किती काम बाकी आहे, आदींचा आढावा घेतला.